**प्रेस नोट दि. ०६.०४.२०२६ ला.प्र.वि.सांगली युनिट**

**आरोपी लोकसेविका सौ. शितल बाळासाहेब पाटील, वय-४३ वर्षे, पद - सरपंच, ग्रामपंचायत, वाकुर्डे खुर्द ता.शिराळा, जि.सांगली व आरोपी लोकसेवक श्री.बाळासाहेब आकाराम पाटील, वय-५३ वर्षे, पद - प्राथमिक शिक्षक, प्राथमिक शाळा जाधववाडी, माधळगाव, केंद्र वाकुर्डे खुर्द ता.शिराळा, जि.सांगली यांनी तक्रारदार यांचेकडे ३५,०००/- रूपये लाचेची मागणी करून सापळा कारवाईमध्ये ३५,०००/- रुपये लाच रक्कम स्विकारली असता पकडलेबाबत. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सांगली विभागाची कारवाई..**

| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक** | सांगली |
|---|---|
| **पोलीस स्टेशन** | शिराळा पोलीस ठाणे, जि.सांगली |
| **गुन्हा नोंद क्रमांक व कलम** | गुन्हा दाखल करणेची प्रक्रिया सुरू आहे. |
| **तक्रारदार** | पुरुष वय २८ वर्षे |
| **आरोपी लोकसेवकाचे नांव व कार्यालय** | आरोपी क्र. १) लोकसेविका सौ. शितल बाळासाहेब पाटील, वय-४३ वर्षे, पद - सरपंच, ग्रामपंचायत, वाकुर्डे खुर्द ता.शिराळा, जि.सांगली,<br>आरोपी क्र. २) लोकसेवक श्री.बाळासाहेब आकाराम पाटील, वय-५३ वर्षे, पद - प्राथमिक शिक्षक, प्राथमिक शाळा जाधववाडी, माधळगाव, केंद्र वाकुर्डे खुर्द ता.शिराळा, जि.सांगली, दोन्ही राहणार - पाटील गल्ली, वाकुर्डे खुर्द, ता.शिराळा जि.सांगली. |
| **पडताळणी कारवाई वेळी मागणी केलेली लाचेची रक्कम व दिनांक** | दि.०६.०४.२०२६ रोजी ३५,०००/- रूपये लाचेची मागणी |
| **सापळा कारवाई वेळी स्विकारलेली लाचेची रक्कम** | ३५,०००/- (पस्तीस हजार रूपये ) |
| **सापळा कारवाई दिनांक व ठिकाण** | दि.०६.०४.२०२६ रोजी ३५,०००/- रूपये लाचेची रक्कम तहसिल कार्यालय शिराळा समोरील हॉटेल दौलत येथे स्विकारली आहे. |
| **थोडक्यात हकीकत** | यातील तक्रारदार यांना वाकुर्डे खुर्द, तालुका शिराळा येथील संत रोहिदास नगर वाकुर्डे खुर्द येथे अनुसूचित जाती व जमाती नवबौद्ध घटकांचा विकास करणे या योजनेअंतर्गत पेविंग ब्लॉक बसवणे कामाच्या देखरेख व प्रशासकीय कामकाजासाठी मक्तेदार यांचेकडून अधिकार पत्र देण्यात आले होते. सदर काम पूर्ण झाले असून सदर कामाचे अनुदानाचा पहिला हप्ता मक्तेदार यांना प्राप्त झाला असून उर्वरित हप्ता मिळणे करिता तक्रारदार यांना सदर काम ग्रामपंचायतीला हस्तांतरित केल्याची पावती आवश्यक होती .तसेच सदर कामाचे संदर्भातील विमा, उपकर, आयकर, टेंडर प्रमाणे, सीजीएसटी व एसजीएसटी अशा शासन कपाती शासनास जमा होणे आवश्यक होते.<br>सदर कामाची ताबा पावती वर सरपंच व ग्रामसेवक यांची सही आवश्यक असून तक्रारदार यांना ती पावती देणे करिता तसेच सदर कामाची शासन कपाती शासनास जमा करणे करिता आरोपी क्रमांक १) लोकसेविका शितल पाटील सरपंच ग्रामपंचायत वाकुर्डे खुर्द व त्यांचे पती आरोपी क्रमांक २) श्री बाळासाहेब पाटील यांनी सदर कामाचे एकूण मंजूर अनुदान रकमेच्या ७ टक्के रक्कम लाच मागितले बाबतचा तक्रार अर्ज तक्रारदार यांनी दिनांक ०६/०४/२०२६ रोजी सांगली लाच लुचपत प्रतिबंधक विभागाकडे दिला होता.<br>तक्रारदार यांच्या तक्रारीनुसार दि. ६/४/२०२६ रोजी पडताळणी कारवाई केली असता आरोपी क्रमांक १) लोकसेविका शितल बाळासाहेब पाटील व त्यांचे पती आरोपी क्रमांक २) श्री बाळासाहेब आकाराम पाटील यांनी तक्रारदार यांच्याकडे तक्रारदार यांना सदर कामाची ताबा पावती देण्याकरिता तसेच सदर कामाच्या कपाती शासन जमा करण्याकरता तक्रारदार यांच्याकडे सदर कामाचे एकूण मंजूर अनुदान रकमेच्या प्रथमतः सात टक्के, त्यानंतर पाच टक्के प्रमाणे ५० हजार रुपये व तडजोडीअंती ३५ हजार रुपये पंचासमक्ष लाचेची मागणी तक्रारदार यांच्याकडे तहसील कार्यालय शिराळा समोर असले हॉटेल दौलत मध्ये केल्याचे निष्पन्न झाले.<br>दि. ०६/०४/२०२६ रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाईदरम्यान आरोपी क्रमांक १) लोकसेविका सौ शितल बाळासाहेब पाटील व आरोपी क्रमांक २) श्री बाळासाहेब आकाराम पाटील असे, शिराळा तहसील कार्यालयासमोर असलेले हॉटेल दौलत चे पोर्चमध्ये लाच रक्कम स्वीकारण्यास येऊन आरोपी लोकसेविका सौ शितल पाटील यांनी ३५ हजार रुपये लाच रक्कम तक्रारदार यांचेकडून स्वीकारली असता त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.<br>त्या अनुषंगाने आरोपी लोकसेविका सौ. शितल बाळासाहेब पाटील, वय-४३ वर्षे, पद - सरपंच, ग्रामपंचायत, वाकुर्डे खुर्द ता.शिराळा, जि.सांगली व आरोपी लोकसेवक श्री.बाळासाहेब आकाराम पाटील, वय-५३ वर्षे, पद - प्राथमिक शिक्षक, प्राथमिक शाळा जाधववाडी, माधळगाव, केंद्र वाकुर्डे खुर्द ता.शिराळा, जि.सांगली यांचेविरूध्द शिराळा पोलीस ठाणे येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७, ७ अ, १२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरू आहे. |
| **तपास अधिकारी** | श्री. योगेश चव्हाण, पोलीस निरीक्षक, ला. प्र. वि. सांगली |
| **मार्गदर्शन अधिकारी** | पोलीस उप-आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री.शिरीष सरदेशपांडे,<br>अपर पोलीस अधीक्षक श्री. अर्जुन भोसले, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे |

| | |
|---|---|
| **सापळा पथक** | श्रीमती यास्मीन इनामदार, पोलीस उप अधीक्षक, अंन्टी करप्शन ब्युरो, सांगली, पोलीस निरीक्षक, **श्री.किशोरकुमार खाडे**, श्री.योगेश चव्हाण, तसेच पोलीस अंमलदार प्रितम चौगुले, अजित पाटील, चंद्रकांत जाधव, पोपट पाटील, उमेश जाधव, सलीम मकानदार, ऋषिकेश बडणीकर, रामहरी वाघमोडे, धनंजय खाडे, सुदर्शन पाटील, सागर नायकुडे, राजेश मुदगल, महेश शेंडगे, चालक विठ्ठलसिंग राजपूत, |

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४, व्हॉट्स अॅप व मोबाईल नंबर ९४०४०४१०६४ वर संपर्क साधावा.

पोलीस उप अधीक्षक ★ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सांगली
सत्यमेव जयते

श्रीमती यास्मीन शरीफ इनामदार
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
सांगली.